**<u>फियादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ सुदेश दत्ताराम मळीक यांचा पुढील सरतपास फिर्यादी तर्फे विधिज्ञ श्री. व्ही. व्ही. नाईक यांचेकडून सुरु</u> –**

१२) माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर बरोबर असुन तो मला मान्य व कबुल आहे. त्यावर मी सही केलेली आहे. दि.१३.०७.२०२३ रोजीचा रामा महाले यांनी सही केलेला धनादेश मी याकामी हजर केलेला आहे. आता मला सदरचा धनादेश दाखविण्यात आला. तो तोच आहे. सबब, त्यास **निशाणी क्र.C–1/CW1** देण्यात येत आहे. रक्कम रु.६०,०००/– चा आरोपीने सही केलेला माझ्या नावे पारीत केलेला धनादेश क्र.२९ या कामी मी हजर केलेला आहे. आता मला सदरचा धनादेश दाखविण्यात आला. तो तोच आहे. सबब, त्यास **निशाणी क्र.C–2/CW1** देण्यात येत आहे. त्यानंतर मी बँकेकडुन प्राप्त झालेले दोन चेक रिर्टन मेमो हजर केलेले आहेत. एक चेक रीर्टन मेमो ५,००,०००/– किंमतीच्या संदर्भातील आहे व दुसरा चेक रिर्टन मेमो ६०,०००/– किंमतीच्या संदर्भातील आहे. ते मला दाखविण्यात आले. ते तेच आहेत. सबब, त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.C–3/CW1 व C–4/CW1** देण्यात येत आहेत. त्यानंतर मी आरोपीस नोटीस पाठविली. ती नोटीस मी याकामी हजर केलेली आहे. आता मला ती नोटीस दाखविण्यात आली. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सबब, त्यास **निशाणी क्र.C–5/CW1** देण्यात येत आहे. त्या नोटीस पाठविल्याची पोष्टाची पावती व ए.डी.पावती मी याकामी हजर केलेल्या आहेत. आता

मला सदरच्या दोनही पावत्या दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. सबब, त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.C-6/CW1 व C-7/CW1** देण्यात येत आहेत.

**सरतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2025.11.20 13:44:02 +0530

ठिकाणः- दोडामार्ग.
दिनांकः- २०/११/२०२५.

(वाय. पी. बावकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दोडामार्ग.